# महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती

**मध्यवर्ती कार्यालय :– 'तारांगण'**, कुंदा स्मृती केंद्र, १२, युनायटेड वेस्टर्न बँक कॉलनी, शाहू नगर, गोडोली, सातारा– ४१५००१.
दूरध्वनी :(०२१६२)२२०६५९, मोबाईल: ९४२३८६६५४०. ई–मेल ndabholkar123@gmail.com

**राज्य कार्याध्यक्ष संपर्क:– 'भास्कर'**,६८, कालीकादेवी नगर, संघमा चौक, गोळीबार टेकडी रस्ता, धुळे–४२४००१.
दूरध्वनी : (०२५६२) २४४२६९, मोबाईल–९४२२७९०६१०, ई–मेल avinashpatilmans@gmail.com

विज्ञान निर्भयता नीती

## महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती व विवेक वाहीनी आयोजित जोडीदाराची विवेकी निवड– राज्यव्यापी युवा संकल्प अभियान

## विवाह आणि बदलती जीवनशैली

२१ वे शतक हे मानवाच्या उत्क्रांतीच्या इतिहासाचे सोनेरी पर्वच म्हणावे लागेल. नवनवीन शोध, संशोधन, चंद्रच नव्हे तर मंगळावर मानवाने केलेली चढाई, क्लोनिंग सारखे निसर्गाला आव्हान देणारे मानवाने केलेले प्रयोग हे सर्व पहाता आपण आश्चर्यचकित होतो. मानवाने केलेले प्रयोग हे सर्व पहाता आपण आश्चर्यचकित होतो. मानवाने त्याच्या बुद्धी सामर्थ्याने सर्व जगच नव्हे तर संपूर्ण अवकाश आज काबिज केले आहे.

माहिती व तंत्रज्ञान शास्त्राच्या विकासातील प्रगतीकडे पहाता तर आजचा मानव हा काळाच्या खूपच पुढे–पुढे धाव घेतो आहे असे दिसते. एका जागेवर बसुन संपूर्ण जगात फेरफटका मारून आपण येतो. इंटरनेटमुळे सर्व जगच आपल्या जवळ आले आहे.

आज या सर्व गोष्टी जेव्हा लहान मुले लिलया वापरताना दिसतात जेव्हा गंमत म्हणून इसवीसन दोन हजार वर्षांपूर्वी जग कसे असेल याचा विचार मनात येतो. ज्या संथ लयीने माणूस तेव्हा विचार करत असेल, ज्या संथ लयीने जगातील व्यवहार तेव्हा चालत असतील ते आजही तसेच चालले तर आपणास चालेल का असा विचार मनात डोकावतो.

खरेतर प्रत्येक शतकात नवनवीन शोध लागले आहेत. दरवेळेस एक–एक पाऊल आपण पुढे सरकलो, अज्ञानातून ज्ञानाकडे चाललेला हा प्रवास आजही चालू आहे. प्रत्येक वेळेस काळाच्या पुढे जावून भविष्याचा वेध माणूस घेतच असतो. ज्ञानाने, विचाराने, कृतीने स्वत:ला प्रगल्भ करणे हा मानवाचा स्थायीभाव आहे. मात्र काही बाबतीत आपण आजही अंधश्रद्धा बाळगतो. कुटुंबसंस्था, विवाहसंस्था काळाच्या ओघात मानवाने स्विकारली. या संस्थांचे जसे काही फायदे आपणास मिळाले तसेच या संस्थामुळेच काही तोटेही आपल्या वाट्याला आले आहेत. संस्कृतीच्या नावाखाली आजही आपण वेदकालीन वर्णव्यवस्था मानतो. ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य, क्षुद्र ही वर्णव्यवस्था आज वरवर पहाता मागे पडलेली दिसत असली तसेच दत्तक मूल स्विकारणे, आंतरजातीय/जपण्याची भाषा बोलली जाते तेव्हा ही मानसिकता डोके वर काढताना दिसते. अशा विचारांमुळे समाजव्यवस्था ढवळून निघते. सामाजिक संघर्ष होताना दिसतात.

शारीरिक गरजा, सुरक्षितता, पुर्ननिर्माण या महत्वाच्या बाबी पूर्ण करण्याकरिता

मनुष्यप्राणी टोळ्यांतून राहू लागला. लहान लहान शेतीतील प्रयोग तो करु लागला. शेती, बीजाचे संरक्षण, पशुपालन, शिकार, शेती व शिकारीकरिता शस्त्र निर्मिती तो हळूहळू करु लागला.

वाढवणे, जोपासणे या स्त्रीच्या अंगभूत गुणांमूळें काही जबाबदाऱ्या आपसूक तिच्याकडे आल्या. सर्व घराची, शेतीची, पशुपालनाची तसेच मुलांच्या संगोपनाची जबाबदारी घेणारी स्त्री ही त्याकाळी अत्यंत महत्वाची ठरली. सर्व मालमत्तेची काळजी घेणारी म्हणून पुरुष तिला जपू लागला, तिला संरक्षण देवू लागला. मात्र हळूहळू पुरुष व स्त्रीच्या प्रमुख भूमिकेत येथेच फरक पडत गेला.

संपूर्ण टोळीमधे अत्यंत महत्वाची असणारी व्यक्ती म्हणून अशा सक्षम स्त्रीला तिच्या पालकांकडून पुरुष धन-धान्य, गाई-गुरे देवून विकत घेवू लागला. तिच्यावर मालकी हक्क प्रस्थापित करु लागला. स्त्रीला विकत घेवून, स्वत:चा मालकी हक्क तिच्यावर प्रस्थापित करण्याच्या प्रक्रियेला हळूहळू सोहळ्याचे स्वरुप येवू लागले. याच प्रक्रियला पुढे विवाह म्हणून संबोधले जावू लागले.

विवाहानंतर त्या पुरुषाकडून टोळीची संख्या, सामर्थ्य वाढविण्याचे प्रयत्न जाणिवपूर्वक होवू लागले. त्या त्या भागातील टोळी, विशिष्ट वैशिष्टये असणारी टोळी, ओळखता यावी याकरिता विशिष्ट नावाने या टोळ्या संबोधल्या जावू लागल्या व कुटुंबे उदयास आली.

अशा प्रकारे ढोबळमानाने या दोन्ही संस्थांचा इतिहास सांगता येईल. अनेक देश, प्रदेश यांच्या स्थळ, काल वैशिष्ट्यांनुसार या टोळ्यांमधे विविधता दिसून येते.

जात, धर्म, विवाह, कुटुंब संस्था या सर्व मानवनिर्मित आहेत. विकासाच्या वेगवेगळ्या टप्प्यात त्या आल्या आहेत. मुख्यत: श्रमविभागणीकरिता जाती, पोटजाती, आपणाकडे रुढ झाल्या आहेत. वेगवेगळ्या जाती-धर्मांमध्ये वेगवेगळ्या चालीरिती, रुढी-परंपरा, खाण्या-पिण्याच्या पद्धती, भाषा आढळतात. व्यक्ती आपल्या जातीची/धर्माची वैशिष्ट्ये अत्यंत श्रद्धेने, आग्रहाने संस्कृती टिकविण्याच्या नावाखाली जपताना दिसतात.

संस्कृती म्हणजे जुने ते सोने हा विचार खरेतर आज मागे टाकायला हवा आहे. जुने ते सर्वच सोने नाही आणि जुने ते सर्व टाकाऊ पण नाही पण काळानुरुप बदलणाऱ्या जीवनशैलीच्या आवश्यकतेनुसार काही बदल स्वागतार्हच असतात. जुना विचार, जुने यंत्र, जुनी आचार पद्धती अशा अनेक गोष्टी आपण लीलया मागे टाकतो. मात्र रुढी, परंपरा चालीरिती याबाबतीत मात्र आपण फार आग्रही असतो. परंपरा, चालीरिती जपणे, जोपासणे यांची संपूर्ण जबाबदारी प्रत्येक विकासच्या टप्प्यामधे स्त्रीवरच सोपविलेली दिसते. जर स्त्रीने ते जोपासले नाही तर कुटुंबाची प्रतिष्ठा कमी होते. खरेतर या सर्व गोष्टी फायद्याच्या असतील तर त्या पुरुषांनीही जपल्या पाहिजेत.

२१ व्या शतकाच्या पुर्वार्धापासून स्त्रीचे समाजातील स्थान बदलत आहे. शिक्षणामुळे स्त्रीने स्वत:ला समृद्ध केले आहे. ज्ञान, तंत्रज्ञान, शोध, संशोधन, शास्त्र, अवकाश, संरक्षण, कला, साहित्य अशी अनेक क्षितीजे तिने काबीज केली आहेत. स्त्रीचे स्थान उंचावत आहे. तो बदलण्याची गरज आहे.

भारतात १९७५ मधे पुरुषप्रधान संस्कृतीच्या विरोधात अनेक आंदोलने, चळवळी झाल्या. स्त्रीने दुय्यम स्थान नाकारले, तिच्यावर होणरी हिंसा तसेच तिच्यावर लादली जाणरी बंधने तिने झुगारली. एक मानव म्हणून तिचा समाजाने स्विकार करुन, एक व्यक्ती म्हणून तिला तिचे सर्व अधिकार मिळाले पाहिजेत यासाठी अनेक स्त्रिया संघटीत झाल्या. आपले हक्क मिळविण्यासाठी त्यांनी रस्त्यावर येणे पसंत केले, योग्य कामाचे योग्य वेतन मिळावे तसेच कामाच्या ठिकाणी तिला काही खास सोई-सुविधा मिळाव्यात याकरिता स्त्रिया एकत्र आल्या. मानसिक गुलामगिरीतून मुक्त व्हावे याकरिता अनेक प्रयत्न संघटितरित्या केले गेले.

स्त्रीकडे केवळ देवता, गृहिणी, पायाची दासी किंवा पायातली बेडी म्हणून न पहाता एक संपूर्ण विकसीत व्यक्तीमत्त्व म्हणून तिचा स्विकार सर्वांनी (स्त्री व पुरुष दोघांनी) केला पाहिजे अशी मागणी तिची होती.

स्त्री व पुरुष हे कुटुंबाचेच नव्हे तर संपूर्ण समाजाचे, मानवजातीचे भक्कम असे दोन आधार आहेत. स्त्री-पुरुषांनी एकत्र येवून निसर्गनियमानुसार जीवन पुढे पुढे नेणे तसेच त्या जीवनात समानतेच्या तत्त्वाचा आधार घेवून आनंद घेणे गरजेचे आहे. एकाला जीवन जगण्याचा, आनंदाने/सुखाने जीवनाचा आस्वाद घेण्याचा अधिकार जास्त व दुसऱ्या कमी ही रचना चुकीची आहे.

स्त्री जर पुरुषाच्या मागे राहिली/दुय्यम राहिली तर सहजीवनाचा आनंद, बरोबरीच्या नात्यातून मिळणारा आनंद पुरुषाला देखील मिळणार नाही व त्याचे व्यक्तीमत्व देखील अपुरे राहिल.

अपुर्णत्वाकडे जाण्याचा प्रवास दोघांनी एकत्र येवून सहप्रवासी होवून करायचा असेल तर विवाहाच्या उंबरठ्यावर दोघांनी एकत्रितरित्या या सर्व प्रक्रियेचा, समाजबदलाच्या प्रक्रियेचा विचार जरुर करावा

**-अविनाश पाटील,**

राज्य कार्याध्यक्ष,

महाराष्ट्र अंनिस.